# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ए.एम.एफ.यु., इगतपुरी, विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल:igatpuri.amfu@gmail.com

**१८) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि.३०.०५.२०२५**

**जिल्हा : नाशिक**

| मागील आठवड्यातील हवामान (२४/०५/२०२५ ते ३०/०५/२०२५) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (३१/०५/२०२५ ते ०४/०६/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | दिनांक | ३१ | ०१ | ०२ | ०३ | ०४ |
| ०.० | २.० | ५.६ | २२.७ | ३.४ | ३०.१ | ०.० | पाऊस (मिमी) | २.० | ४.० | ८.० | ९.० | ३.० |
| ३०.५ | ३०.५ | ३०.५ | २७.० | २५.० | २४.५ | २७.५ | कमाल तापमान (अं.से.) | ३१ | ३३ | ३४ | ३४ | ३३ |
| २४.० | २३.८ | २४.० | २१.७ | २२.१ | २१.७ | २३.० | किमान तापमान (अं.से.) | २३ | २४ | २४ | २४ | २४ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढग स्थिती (आकाश) | ढगाळ | अ: ढगाळ | ढगाळ | ढगाळ | अ: ढगाळ |
| ७० | ९१ | ९४ | ९४ | ९६ | ९६ | ९४ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८० | ८२ | ८० | ८० | ८० |
| ८० | ८१ | ९६ | ९२ | ९७ | ६९ | ६५ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६८ | ६९ | ६९ | ७४ | ७३ |
| ४.३ | ४.९ | ४.२ | ३.६ | ३.४ | ३.१ | ७.२ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | २६ | ३० | २२ | २३ | २० |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश** | | पुढील पाच दिवसाचा अंदाज लक्ष्यात घेता नाशिक जिल्ह्यात दि. ३१ मे ते ०४ जून २०२५ दरम्यान हलक्या पावसाची शक्यता आहे. आकाश पुढील पाच दिवस ढगाळ राहील. तसेच कमाल तापमान ३१-३४ डिग्री सें. व किमान तापमान २३-२४ डिग्री सें. दरम्यान राहण्याची शक्यता आहे. तसेच वा-याचा वेग २०-३० कि.मी/तास या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| **सामान्य सल्ला** | | वापसा आल्यानंतर कुळवाने मशागत करावी म्हणजे उगवलेल्या ताणाचा बंदोबस्त होईल व शेत पेरणी योग्य होईल. खरीप हंगामातील पिकांच्या पेरणीसाठी दर्जेदार व प्रमाणित बियाण्याचे नियोजन करावे.<br>जमीनीतील तापमान कमी झालेले नसतानाही कापूस पिकाची लागवड केल्यास कीड व रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते, त्यामुळे जमीनीतील तापमान कमी झाल्याशिवाय लागवडीची घाई करू नये.<br><u>कोरडवाहू पिके</u><br>हलक्या जमिनीत वापसा आल्यानंतर कुळवाने पूर्व मशागत करून बियाण्यास फुले सुपर बायोमिक्सची बीज प्रक्रिया करूनच पेरणी करावी.<br>कोरडवाहू भागात ज्या ठिकाणी जमिनीची पूर्व मशागत झालेली असल्यास आणि पेरणी योग्य १०० मी मी पेक्षा जास्त पाऊस झाला आहे अशा ठिकाणी वापसा आल्यानंतर जमिनीच्या मगदुराप्रमाणे खाली नमूद केल्या प्रमाणे पेरणी करावी.<br>हलकी जमीन : हुलगा, मटकी<br>मध्यम व भारी जमीन : उडीद, मूग, चवळी, सूर्यफूल, तूर<br><u>आंतरपिक पद्धत:</u><br>येत्या कालावधी मधील पावसाची अनिश्चितता लक्षात घेता, कोरडवाहू विभागामध्ये तूर + सूर्यफूल (२:१), तूर + बाजरी (२:१), तूर + मूग / उडीद (२:१) आंतरपीक पद्धतीचा अवलंब फायदेशीर ठरू शकेल. |
| **संदेश** | | **हलक्या पावसाचा तसेच जोराचे वारे वाहण्याचा अंदाज लक्ष्यात घेता भाजीपाला व फळपिकांना काठीचा आधार द्यावा.** |
| **उन्हाळी बाजरी** | **कापणी /मळणी / साठवणूक** | परिपक्व झालेल्या उन्हाळी बाजरी कापणी पूर्ण करून घ्यावी. तसेच पिकाची मळणी यंत्राच्या सहय्याने लवकरात लवकर पूर्ण करून धान्य उन्हात वाळवून सुरक्षित जागेवर साठवणूक करावी.<br>(पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता स्वच्छ हवामान दरम्यानच सदरील कामे करावीत) |
| **उन्हाळी भुईमुग** | **काढणी /मळणी / साठवणूक** | परिपक्व झालेल्या उन्हाळी भुईमुग काढणी पूर्ण करून घ्यावी.<br>भुईमुग पिकाच्या शेंगा तोडणी साठी भुईमुग <u>शेंगा तोडणी चौकट</u> व शेंगा फोडणी साठी <u>भुईमुग शेंगा फोडणी यंत्राचा</u> उपयोग केला असता शेंगा तोडण्याचा व शेंगा फोडण्याचा वेग वाढतो तसेच वेळ, श्रम व पैसा वाचतो.<br>काढणी केलेल्या शेंगा वाळवून त्यातील ओलावा १० टक्क्यांपर्यंत कमी करावा. यामुळे शेंगा साठवणुकीमध्ये सुरक्षित राहतात. उन्हात शेंगा वाळविणे ही चांगली व सोपी पद्धत आहे. शेंगामध्ये बुरशी वाढू नये, म्हणून शेंगा लवकर वाळवाव्यात. मात्र उन्हाळी भुईमुगाच्या शेंगा बियाण्यासाठी घेतल्या असतील, तर त्या उन्हात वाळवू नयेत, अन्यथा बियाण्याची उगवणशक्ती कमी होते.<br>(पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता स्वच्छ हवामान दरम्यानच सदरील कामे करावीत) |

# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ए.एम.एफ.यु., इगतपुरी, विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल:igatpuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| **खरीप भात** | **पूर्व मशागत** | भात पिकाचे चांगल्या प्रतीचे सुधारित वाण जसे इंद्रायणी, फुले समृद्धी, भोगावती व फुले राधा विकत घेण्याचे नियोजन करावे<br>वाफसा स्थिती असलेल्या भागात पूर्व मशागतीचे कामे पूर्ण करून घ्यावीत. कारण भात पिकाच्या योग्य वाढीसाठी शेताची योग्य प्रकारे पूर्वमशागत करणे अत्यंत महत्वाचे असते. पूर्वमशागतीमुळे जमिनीच्या विविध थरांची उलथापालथ होते आणि काही प्रमाणात तण, कीड व रोगांचेही नियंत्रण होते.<br>सेंद्रिय खतांचा वापर : नांगरणीच्या वेळी हेक्टरी १० मे. टन शेणखत अथवा कंपोस्ट खत मातीमध्ये पूर्णपणे मिसळून द्यावे. |
| **खरीप नाचणी** | **पूर्व मशागत** | सुधारित वाण: फुले नाचणी, दापोली-१, दापोली सफेद, दापोली-२, फुले कासारी.<br>वाफसा स्थिती असलेल्या भागात पूर्व मशागतीचे कामे पूर्ण करून घ्यावीत. २५ ते ३० सें.मी. खोली असलेल्या उथळ जमिनीची एक नांगरणी उतारास आडवी आणि दोन कुळवाच्या पाळ्या देणे. पेरणीपूर्वी मशागत करताना सेंद्रिय खताची मात्रा ५ टन / हेक्टरी मिसळावे. |
| **खरीप बाजरी, सोयाबीन मुग, उडीद व तूर** | **पूर्व मशागत** | वाफसा स्थिती असलेल्या भागात पूर्व मशागतीचे कामे पूर्ण करून घ्यावीत. खरीप बाजरी, सोयाबीन, मुग, उडीद व तूर पिकांकरिता शेतीची पेरणीपूर्वी खोल नांगरट करावी, कुळवच्या २ पाळ्या द्याव्यात व शेतातील काडीकचरा वेचून घ्यावा. तसेच हेक्टरी ५ टन शेणखत शेतात मिसळावेत. |
| **द्राक्षे** | | ढगांमुळे तापमानात त्वरित घट होऊन आद्रतेत वाढ होते. वातावरणातील अशा अचानक बदलांमुळे द्राक्ष बागेत प्रामुख्याने बुरशीजन्य करपा (ॲन्थ्रॅक्नोज) आणि जीवाणूजन्य करपा (बॅक्टरीअल ब्लाईट किंवा बॅक्टरीअल लीफ स्पॉट) या रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता वाढते.<br><u>बुरशीजन्य करपा उपाययोजना</u><br>बागेत निघालेल्या अनावश्यक कोवळ्या फुटी काढून टाकल्यास रोग नियंत्रणास मदत होते.<br>थायोफिनेट मिथाईल (७० डब्ल्यूपी) १ ग्रॅम किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड (५० डब्ल्यूपी) २.५ ग्रॅम प्रति लिटर पाणी किंवा कासुगामायसिन (५%) + कॉपर ऑक्सिक्लोराइड (४५% डब्ल्यूपी) (संयुक्त बुरशीनाशक) ३०० ग्रॅम प्रति एकर याप्रमाणे फवारणी केल्यास नियंत्रण सोपे होईल.<br>ट्रायकोडर्मा २ ते ५ मिली प्रति लिटर पाणी याप्रमाणे दर १५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी.<br>ट्रायकोडर्मा २.५ ते ३ लिटर प्रति एकरी याप्रमाणे ठिबकद्वारे ड्रेंचिंग केल्यास वेलीमध्ये रोग प्रतिकारशक्ती निर्माण होते.<br><u>जिवाणूजन्य करपा उपाययोजना</u><br>या रोगाच्या नियंत्रणाकरिता मॅन्कोझेब (४५ डब्ल्यूपी) २ ते २.५ ग्रॅम प्रति लिटर पाणी किंवा कासुगामायसीन (५%) + कॉपर ऑक्सिक्लोराइड (४५% डब्ल्यूपी) (संयुक्त बुरशीनाशक) ३०० ग्रॅम प्रति एकर याप्रमाणे फवारणी करावी. या रोगाच्या प्रादुर्भावास प्रतिबंध करण्यासाठी स्ट्रेप्टोमायसिनचा वापर करू नये.<br>(पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता स्वच्छ हवामान दरम्यानच सदरील कामे करावीत) |
| **डाळिंब** | | तोडणीसाठी तयार,न कुजलेल्या फळांची काढणी करावी. ती तात्काळ विक्रीसाठी पाठवावीत. चिरलेली,नुकसानग्रस्त,कुजलेली फळे एकत्रित करून कंपोस्ट खड्ड्यात टाकावीत<br><u>मृग बहार (मे-जून पीक नियमन)</u><br><u>(बागेची अवस्था: विश्रांती अवस्थेचा शेवट/ ताण अवस्था/ मे अखेरीस बहार व्यवस्थापन)</u><br><u>बागेची मशागत</u><br>जर बाग विश्रांती अवस्थेत असेल आणि मे महिन्याच्या शेवटी बहार व्यवस्थापन करायचे असल्यास, आपल्या जमिनीच्या संरचनेनुसार (मातीच्या प्रकारानुसार आणि पाणी धरून ठेवण्याच्या क्षमतेनुसार) झाडांना ताण येण्यासाठी पाणी देणे बंद करावे. मध्यम ते भारी जमिनीमध्ये पाच ते सहा आठवडे किंवा हलक्या जमिनीमध्ये तीन ते चार आठवड्यांमध्ये झाडांना ताण येऊ शकतो. (पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता स्वच्छ हवामान दरम्यानच सदरील कामे करावीत) |
| **आंबा** | | फळे काढल्यानंतर झाडाच्या आतल्या व बाहेरच्या बाजूच्या मेलेल्या फांद्या काढून टाकाव्यात. झाडाच्या मधल्या मुख्य फांदीची छाटणी करावी. जर मधल्या मुख्य फांदीची छाटणी यापूर्वीच केली असेल तर अशा ठिकाणची पाहणी करून पुन्हा जर फांद्या वाढल्या असतील तर त्यांची छाटणी आवश्यक आहे. जेणेकरून झाडांमध्ये सूर्यप्रकाश व हवा खेळती राहील. कापलेल्या भागावर बोर्डोपेस्ट लावावी. ज्या फांद्यांवर फळे धरली होती, अशा फांद्या सुमारे ३० ते ४५ सें.मी. अंतरापर्यंत पाठीमागे कापाव्यात. जर झाडावरती फांद्या घन झाल्या असतील तर अशा फांद्यांची विरळणी करावी. |
| **कांदा** | **साठवणूक** | <u>रब्बी (उन्हाळ) कांदा-साठवण</u><br>कांदाचाळीतील तापमान अधिक व आर्द्रता कमी असल्यामुळे वजनात घट होते. साठवणगृहातील तापमान व आर्द्रता यांचा विचार करणे आवश्यक असते. म्हणून नैसर्गिक वायुवीजनाचा वापर करून साठवणगृहाची रचना केल्यास तापमान व आर्द्रता काही अंशी मर्यादित ठेवून साठवणुकीतील नुकसान कमी करता येऊ शकते.<br>सावलीमध्ये सुकविलेल्या कांद्याची प्रतवारी करुन कांदाचाळीमध्ये साठवणुक करावी. तसेच चाळीच्या चारही बाजुस व तळाला बुरशिनाशकाची फवारणी करावी. |

# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ए.एम.एफ.यु., इगतपुरी, विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल:igatpuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| **टोमॅटो** | | टमाटे पिकवाढीच्या अवस्थेनुसार योग्य काळजी घेणे गरजेचे असते. आंतरमशागत, पाणी आणि खत व्यवस्थापन, कीड-रोग नियंत्रण आदी बाबींचे नियोजन वाढीच्या अवस्थेनुसार करावे. |
| **पशुधन (गाय, म्हैस)** | | लसीकरणादरम्यान घ्यावयाची काळजी<br>लसीकरण शक्यतो सकाळ किंवा संध्याकाळी करावे. लसीकरण हे फक्त निरोगी जनावरांमध्ये करण्यात येते. लसीची मात्रा आणि लस देण्याची पद्धती ही लस उत्पादन करणाऱ्या कंपनीने ठरवलेलीच वापरावी. शक्यतो एका ठिकाणच्या जनावरांचे लसीकरण हे एकाच दिवशी करावे. गाभण जनावरांत लसीकरण करू नये. |
| **शेळी** | | मे व जूनमधील शेळ्यांतील व्यवस्थापन<br>कमी उत्पादन देणाऱ्या व प्रजननाचे विकार असलेल्या शेळ्या कळपातून काढून टाकाव्यात. (एकूण संख्येच्या २० टक्के). त्यांच्या जागी नवीन जातिवंत व चांगल्या शेळ्या निवडाव्यात.<br>नवीन पैदाशीचे बोकड निवडावेत.<br>शेळ्यांच्या वेगवेगळ्या शारीरिक व्याधींवर लक्ष ठेवावे.<br>शेळ्यांच्या प्रजननाची व पैदाशीची तयारी करावी. |
| **मेंढी** | | मे मधील मेंढ्यांतील व्यवस्थापन<br>मेंढ्यांच्या वाड्यामधील मातीचा थर बदलून घ्यावा.<br>मेंढ्यांना जुलाब व उष्माघातापासून संरक्षण करण्याकरिता उपाययोजना कराव्यात.<br>मेंढ्या माजावर येण्याकरिता मेंढ्यांना पौष्टिक आहार द्यावा.<br>प्रती मेंढी १० ग्रॅम खनिज मिश्रण आणि १० ग्रॅम मीठ खाद्यातून द्यावे.<br>सर्व मेंढ्यांना पी.पी.आर. रोग प्रतिबंधात्मक लसीकरण करून घ्यावे. (सदर लस ही तीन वर्षांतून एकदाच द्यायची असते) |

**स्त्रोत:**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : ग्रामीण कृषि मौसम विभाग वेधशाळा विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

**ठिकाण** : विकृसंके, इगतपुरी

**दिनांक** : ३०. ०५. २०२५

**स्वाक्षरीत/-**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, इगतपुरी**

**तथा सहयोगी संशोधन संचालक,**

**वि.कृ.सं.के., इगतपुरी, जि. नाशिक**